प्रेसनोट –

दत्तवाडी पो.स्टे.पुणे
दिं. १६/११/२०१७

## देशी बनावटीचे पिस्टलसह युवक जेरबंद

दिं.१६/११/२०१७ रोजी दत्तवाडी पो. स्टे. कडील पो. ना. ५६५१ घोटकुले, पो. शि. ८४७० खैरे यांना त्यांचे खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, "एक इसम अंगात निळया काळया रंगाचा हाफ टिशर्ट व निळया रंगाची ट्रॅक पॅन्ट व पायात काळया पांढ-या रंगाचे बुट घातलेले आहेत. तो उंचीने मध्यम, डोक्याचे केस कानाकडे बारीक व वरती वाढलेले व दाढी वाढलेली असुन त्या इसमांकडे देशी बनावटीचे पिस्टल असुन तो ते घेवुन विकणेसाठी दत्तवाडी येथील बालशिवाजी चौक येथे येणार आहे" अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने सदरच्या बातमीनुसार मा. डॉ. प्रविण मुंढे मा.पोलीस उप-आयुक्त सो परि-२, मा. डॉ शिवाजी पवार सहा.पोलीस आयुक्त सो, स्वारगेट विभाग पुणे शहर, मा.वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री अनिल पाटील सो व पोलीस निरीक्षक (गुन्हे) कृष्णा इंदलकर सो यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकातील पोलीस उप-निरीक्षक श्री डफळ, पो हवा ३०३२, तानाजी निकम, पो. ना. ५६५१ सुधीर घोटकुले, पो. ना. ४४९१ गाढवे, पो शि ८४७० रोहन खैरे, पो. शि. ८७१० सागर सुतकर, यांनी दत्तवाडी येथील बालशिवाजी चौकाजवळील बालशिवाजी मित्रमंडळ येथे सापळा रचुन बातमीत मिळालेल्या वर्णनाचा इसम बालशिवाजी चौक येथील बालशिवाजी मित्रमंडळ येथे थांबलेला दिसल्याने वरील स्टाफने दिं १६/११/२०१७ रोजी १७/०५ वा. जागीच पकडले. तेव्हा त्यास त्याचा नाव पत्ता विचारता त्याने आपले नाव **सुर्यकांत दशरथ कांबळे वय २२ रा. १३, ताडीवाला रोड, खड्डा झोपडपट्टी जनसेवा मित्रमंडळाच्या समोर पुणे** असे सांगितलेनंतर त्याची झडती घेता त्याचे डावे कमरेला पॅन्टच्या आतमध्ये एक देशी बनावटीचे पिस्टल किं.रू ३०,०००/-चे व खिशात दोन जिवंत काडतुस किं.रु २००/- असा एकुण ३०२००/-रू चा माल मिळून आला असुन त्याचे विरुध्द दत्तवाडी पो. स्टे. येथे भारताचा हत्याराचा कायदा कलम ३(२५), मुं. पोलीस ॲक्ट कलम ३७ (१) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करणेत आला आहे पुढील तपास तपास पोलीस हवालदार तानाजी निकम हे स्वतः करीत आहेत.